ज्ञानगंगा घरोघरी

Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan, Nashik-422 222
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक - 422 222
Ph.- 0253-2231714-15,Fax- 2231716, E-mail : coe@ycmou.digitaluniversity.ac

जावक क्र. परीक्षा/ जाने-2019/260 **परिपत्रक** **दिनांक** - 26.02.2019

1) जानेवारी -2019 मध्ये झालेल्या विविध शिक्षणक्रमाच्या सत्र व अंतिम परीक्षांचे निकाल विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत. संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेल्या निकालाच्या आधारे विद्यार्थ्यांनी दिलेल्या परीक्षेतील संबंधित अभ्यासक्रमास प्राप्त गुणांबाबत पडताळणी करावयाची असल्यास विद्यापीठाच्या धोरणात्मक निर्णयानुसार उत्तरपुस्तिकेबाबत खालील सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहेत.

2) याबाबतचे विहित नमुने व त्याबाबतच्या सूचना विद्यापीठाच्या ycmou.digitaluniversity.ac या संकेतस्थळावरील होमपेजवर ⟶ **Exam. Services** या लिंकवर उपलब्ध आहेत. या सूचनांच्या अधिन राहून विद्यार्थ्याने खाली नमुद केलेल्या विहित मुदतीतच सदरचा अर्ज परस्पर विद्यापीठ मुख्यालयात टपालाद्वारे किंवा समक्ष सादर करावा. **विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही व कोणत्याही परिस्थीतीत अर्जासोबत अदा केलेले शुल्क परत केले जाणार नाही, याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी**

3) गुणफेरमोजणी, स्कॅनकॉपी, पुर्नमुल्यांकन हे फक्त जानेवारी-2019 च्या परीक्षेच्या अभ्यासक्रमांच्या उत्तरपुस्तिकां बाबतीतच होईल. पुर्नमुल्यांकन अर्जासोबत स्कॅनकॉपी उत्तरपुस्तिकेची प्रत जोडणे अनिवार्य आहे.

क्र.	तपशील	प्रती अभ्यासक्रम शुल्क रक्कम रू.	अर्ज स्वीकारण्याची सुरूवातीची दिनांक	अर्ज स्वीकारण्याची अंतिम दिनांक
1.	गुणफेरमोजणी **(VERIFICATION OF MARKS)**	रू.100/-	दि.26.02.2019	दि. 05.03.2019
2	स्कॅन कॉपी **(SCAN COPY OF ANSWER BOOK)**	रू.200/-	दि.26.02.2019	दि. 09.03.2019
3	पुर्नमुल्यांकन **(REVALUATION OF ANSWER BOOK)**	रू.500/-	दि.01.03.2019	दि. 15.03.2019

. **4) शुल्क डी.डी. (फक्त राष्ट्रीयकृत बॅंक) वित्त अधिकारी, य.च.म.मु.वि. नाशिक (Finance Officer, YCMOU, Nashik) यांचे नावे असलेल्या डी.डी. द्वारे तसेच मुख्यालयातील बॅंकेत चलनाद्वारे स्विकारण्यात येईल.**

5) अर्ज परीक्षा नियंत्रक, य.च.म.मुक्त विद्यापीठ, ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ नाशिक-422222 या पत्त्यावर पाठविण्यात यावेत. **पाकीटावर गुणफेरमोजणी, स्कॅनकॉपी, पुर्नमुल्यांकन** बाबतचा स्पष्ट उल्लेख असावा.

परीक्षा नियंत्रक

प्रत - माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी

1) **विभागीय संचालक, य.च.म.मु.विद्यापीठाचे सर्व विभागीय केंद्र** - यांना कळविण्यात येते की, सदरचे परिपत्रक आपल्या अधिनस्त असलेल्या अभ्यासकेंद्राच्या निदर्शनास आणून द्यावे.
2) **केंद्रसंचालक/केंद्रप्रमुख, य.च.म.मु.विद्यापीठाचे सर्व अभ्यासकेंद्र**
3) **उपकुलसचिव, परीक्षा कक्ष-3 आणि सहायक कुलसचिव, परीक्षा कक्ष-1, 2**
4) **संकेतस्थळ**